# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर-४४० ००१ (महाराष्ट्र राज्य)

जा.क्र. मपमविवि/आस्था-६/कुस/पभ/प्रप/१९८९/२०२६, दिनांक : २७/०९/२०२६

वाचा :- जाहिरात क्र मपमविवि /०१/२०२६, दि. २७/०२/२०२६

## प्रसिध्दीपत्रक

शिक्षकेत्तर संवर्गातील रिक्त पदांची जाहिरात संदर्भिय अन्वये दि.२७/०२/२०२६ रोजी देण्यात आली होती. सदर पदाचा निकाल दिनांक २७/०८/२०२६ रोजी जाहिर झालेला असून निवड व प्रतिक्षा यादी दि. २५/०९/२०२६ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअन्वये सरळसेवा भरतीची कार्यवाही पुर्ण करावयाची आहे.

त्या अनुषंगाने निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची दि. ०५/१०/२०२६ रोजी सकाळी ०९.३० वाजता कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर येथे कागदपत्रे तपासणी करण्यात येणार आहे.

तरी संवर्गनिहाय कागदपत्र पडताळणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | दिनांक |
|---|---|---|
| १ | अधिदान व लेखाधिकारी | ०५/१०/२०२६ |
| २ | सहाय्यक व्यवस्थापक (गुणनियंत्रण) | ०५/१०/२०२६ |
| ३ | प्लॉंट ऑपरेटर (दुग्ध प्रक्रिया) | ०५/१०/२०२६ |
| ४ | दुग्धशाळा सहाय्यक | ०५/१०/२०२६ |
| ५ | प्रयोगशाळा सहाय्यक (मत्स्यविज्ञान) | ०५/१०/२०२६ |
| ६ | पशुचिकित्सा प्रयोगशाळा सहाय्यक (VLDA) | ०५/१०/२०२६ |
| ७ | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक | ०६/१०/२०२६ |
| ८ | कनिष्ठ ग्रंथालय सहाय्यक | ०६/१०/२०२६ |
| ९ | ग्रंथालय परिचर | ०६/१०/२०२६ |
| १० | कनिष्ठ यांत्रिकी (यांत्रिकी तथा शितकरण) | ०६/१०/२०२६ |
| ११ | कनिष्ठ यंत्रज्ञ तथा तारतंत्री | ०६/१०/२०२६ |
| १२ | रूग्णालय तंत्रज्ञ | ०६/१०/२०२६ |
| १३ | शस्त्रक्रियागृह तंत्रज्ञ | ०६/१०/२०२६ |
| १४ | शस्त्रक्रियागृह सहाय्यक | ०६/१०/२०२६ |
| १५ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ०६/१०/२०२६ |
| १६ | अधिष्ठाता यांचे तांत्रीक अधिकारी | ०७/१०/२०२६ |
| १७ | रूग्णालय चिकित्सक | ०७/१०/२०२६ |

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | दिनांक |
|---|---|---|
| १८ | सहाय्यक प्रक्षेत्र व्यवस्थापक (पशुवैद्यकीय) | ०७/१०/२०२६ |
| १९ | क्युरेटर कम स्पेसिमन टेक्नीशियन | ०७/१०/२०२६ |
| २० | प्राणिसंग्रहालय तंत्रज्ञ (क्युरेटर) | ०७/१०/२०२६ |
| २१ | व्रणोपचारक | ०७/१०/२०२६ |
| २२ | विस्तार प्रशिक्षण व प्रदर्शन सहाय्यक | ०७/१०/२०२६ |
| २३ | पशुधन सहाय्यक | ०७/१०/२०२६ |
| २४ | प्रक्षेत्र सहाय्यक | ०७/१०/२०२६ |
| २५ | औषध भांडारपाल | ०८/१०/२०२६ |
| २६ | कनिष्ठ भांडारपाल | ०८/१०/२०२६ |
| २७ | वरिष्ठ लिपीक | ०८/१०/२०२६ |

कागदपत्र तपासणीस जे उमेदवार हजर राहणार नाही, त्यांना सदर पदावर रुजु होण्याचे स्वारस्य नसल्याचे गृहीत धरुन प्रतिक्षा यादीतील गुणवत्तेनुसार पात्र उमदेवार यांची निवड करुन त्यांना नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

उमेदवारांनी सोबत जोडलेल्या कागदपत्र/प्रमाणपत्र यांच्या यादीनुसार लागु असलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती व २ स्वयंसाक्षांकित झेरॉक्स् प्रती तसेच नजीकच्या काळातील २ फोटो घेऊन उपस्थित रहावे.

उमेदवारांनी ज्या संवर्गाकरीता अर्ज केला आहे त्या नियोजीत दिनांकास कागदपत्र पडताळणीचे कार्यवाहीस न चुकता उपस्थित राहण्याची नोंद घेण्यात यावी अन्यथा आपला कोणताही दावा सदर पदभरतीच्या अनुषगांने राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहाराची नोंद घेण्यात येणार नाही.

(मोना ठाकुर)
कुलसचिव
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर

# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर-४४० ००१ (महाराष्ट्र राज्य)

जा.क्र. मपमविवि/आस्था-६/कुस/पभ/प्रप/१९९०/२०२६, दिनांक : २७/०९/२०२६

वाचा :- जाहिरात क्र मपमविवि /०१/२०२६, दि. २७/०२/२०२६

## :: आवश्यक सूचना ::

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या शिक्षकेत्तर संवर्गातील पदभरती जाहीरात क्र. मपमविवि/०१/२०२६ नुसार निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी मुळ दस्तावेज पडताळणीच्या वेळी सादर करावयाचे कागदपत्रे/प्रमाणपत्रांची यादी.

१. संबंधीत उमेदवारांची TCS मार्फत बायोमेट्रीक तपासणी होणार असल्याने नियोजीत दिनांकास, उमेदवार यांनी मूळ आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, यापैकी किमान कोणतेही एक मुळ ओळखपत्र तसेच मुळ ओळखपत्राची छायांकित प्रत आणणे बंधनकारक आहे.

२. संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या मुळ अर्जाची प्रिंट आऊट, तसेच परीक्षा शुल्क जमा केल्याचा पुरावा, तसेच परिक्षेसाठीच्या प्रवेशपत्राची प्रत.

३. भारतीय नागरिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Nationality)

४. महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Domicile)

५. माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र

६. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSSC) उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र

७. पदविका प्रमाणपत्र (Diploma Certificate)

८. औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रमाणपत्र (ITI Certificate)

९. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी प्राप्त असल्याबाबतच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र (Degree Certificate)

१०. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी प्राप्त असल्याबाबतच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र (Post Graduate Degree Certificate)

११. शाळा सोडल्याचा दाखला (LC/TC)

१२. मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. इतक्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र/ संगणक टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र (अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत धारण करणे आवश्यक)

१३. सामाजिक आरक्षणातंर्गत निवड झालेल्या उमेदवारांचे (मागासवर्गीय) जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र

१४. आर्थीकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गातील उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९ / प्र.क्र. ३१/१६-अ, दिनांक १२/०२/२०१९ अन्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठीचे प्रमाणपत्र.

१५. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अ.जाती, अ.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागस प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक. ०८) मधील कलम ४ (२) (दोन) मधील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव या प्रवर्गांना लागु करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सी.बी.सी-१०/२००६ /प्र.क्र.-१५ / मावक-५ दिनांक ३०/०६/२००६ सोबतच्या सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी दिनांक २०/०३/२०२६ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र.

१६. सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातील उमेदवारांनी दिनांक २०/०३/२०२६ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र.

१७. नॉन क्रिमिलेअर तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती/ईडब्ल्युएस/अराखीव व्यतिरिक्त इतर सर्व प्रवर्गांना लागू राहिल.

१८. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा पाल्य असलेल्या उमेदवारांनी शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एससोबाय-१२०५ /प्र.क्र.-१८९ / म-७ दिनांक २३/०१/२०१६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असल्यास त्याबाबतचे कागदपत्रे/प्रमाणपत्र.

१९. अंशकालीन कर्मचारी यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवा योजन कार्यालयाकडे केलेल्या नोंदणीचे प्रमाणपत्र आणि अंशकालीन कर्मचारी म्हणून कामकाज केले असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र

२०. माजी सैनिकांनी, जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेबाबतचे प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले सैनिक सेवे संदर्भातील प्रमाणपत्र.

२१. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रीधो २००२ / प्र.क्र.-६८ / क्रीयुसे-०२ दिनांक ०१/०७/२०१६ व प्रचलित शासन निर्णयानुसार विहीत केलेले प्रमाणपत्र.

२२. प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांशी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी (उपजिल्हाधिकारी पुनर्वसन) यांनी निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त बाबतचे प्रमाणपत्र.

२३. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग- २०१८/प्र.क्र.११४/१६-अ दिनांक २९ मे २०१९ तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दिनांक १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संकेतस्थळावरून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले अथवा SADM संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र. तसेच, महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०२५/ प्र.क्र.१०/E office No. १३३९०२०/कार्या ३, ३१, ३२, ३५ ए दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५ अन्वये दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या जागांसाठी उमेदवाराने दिव्यांग व्यक्तींच्या वैश्विक ओळखपत्राच्या (UDID) प्रमाणपत्र.

..३

२४. महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मातंस- २०१२ / प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०४/०२/२०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक अर्हता परीक्षांपैकी कोणतीही एक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT अथवा मान्यता प्राप्त परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

२५. अनाथ आरक्षणाबाबत शासन निर्णय क्र. अनाथ-२०२२/ प्र.क्र. १२२/का-०३ दि.०६/०४/२०२३ मधील तरतुदीनुसार महिला व बालविकास विभागाकडील प्रमाणपत्र.

२६. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम, २००५ मधील तरतूदीनुसार विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र.

२७. उमेदवाराच्या नावात तसेच आडनावात बदल झाला असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या शासकीय मुद्रणालयाच्या अधिसूचनेची प्रत.

२८. विवाहीत स्त्रियाच्या नावातील बदलाबाबत महाराष्ट्र शासनाच्या शासकीय मुद्रणालयाची अधिसूचना किंवा विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला.

२९. शासकीय/ निमशासकीय/ शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था / शासन अनुदानित संस्था / जिल्हा परिषद / विद्यापीठे / शासन अंगीकृत उपक्रम सेवेत कार्यरत असलेले कर्मचारी यांचे नियुक्ती प्राधीकारी / कार्यालय प्रमुखांनी निर्गमित केलेले अनुभव प्रमाणपत्र.

३०. शासकीय/ निमशासकीय/ शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था / शासन अनुदानित संस्था / जिल्हा परिषद / विद्यापीठे / शासन अंगीकृत उपक्रम सेवेत कार्यरत असलेले कर्मचारी यांनी त्यांचे नियुक्ती प्राधीकारी यांच्या परवानगीने (विहित मार्गाने) अर्ज सादर केल्याचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC)

३१. उमेदवार, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत नियमित आस्थापनेवर कार्यरत असल्यास, नियुक्ती प्राधीकाऱ्यांचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC)

३२. महाराष्ट्र-कर्नाटक भागातील उमेदवार असल्याचा पुरावा.

उमेदवारांना उक्तपैकी ज्या बाबीं लागु असेल त्या सर्व कागदपत्रांची पूर्ण पडताळणी तसेच जाहिरातीत नमुद सर्व निकषांची पुर्तता झाल्यानंतर नियुक्तीबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल. वरीलप्रमाणे उमेदवारांना लागु असलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व २ स्वयंसाक्षांकीत झेरॉक्स प्रती तसेच नजिकच्या काळातील पासपोर्ट साईज दोन फोटो घेऊन विद्यापीठातर्फे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या दिनांकारोजी उपस्थित राहावे.

मोना. ठाकुर

(मोना ठाकुर)
कुलसचिव
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर